**रे. दि. मु. क्रमांक ८२/२०१२ मधील नि.क्र. ६३ खालील आदेश.**
**रविंद्र सोनवणे व इतर -विरुध्द- मोहन देडे व इतर**
**आदेश पारित दिनांक १०.०७.२०२३**

---

वादींनी प्रस्तूतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ३ उत्तम वामन सोनवणे यांचे वारस कायदेशीर वारस म्हणून अभिलेखावर नोंद होणेकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जासहीत वादीचे वारस श्री. रविंद्र बाबूराव सोनवणे यांचे सत्यप्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ६४ वर अभिलेखावर दाखल केले आहे.

**०२.** प्रस्तूत अर्जामध्ये असे कथन करणेत आले आहे की, सदरचा दावा चालू असताना या दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ उत्तम वामन सोनवणे हे दिनांक २४.०१.२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्याच्या पुष्ठ्यर्थ वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ३ उत्तम सोनवणे यांच्या मृत्यू उताऱ्याची प्रमाणित प्रत नि.क्र. ६६ वर अभिलेखावर दाखल केली आहे. प्रस्तूत अर्जात नमूद केलेनुसार मयत प्रतिवादी क्र. ३ यांना वारस क्र. ३-अ ते ३-ड असे एकूण चार कायदेशीर वारस आहेत. उपरोक्त नमूद वारसांची नोंद अभिलेखावर व्हावी, तसेच, प्रस्तूतची दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याच्या सरनाम्यामध्ये कोणताही बदल होत नाही. करिता मयत प्रतिवादी क्र. ३ उत्तम सोनवणे यांच्या वारसांच्या नावांची नोंद अभिलेखावर व्हावी अशी विनंती करणेत आली आहे.

**०३.** सदरकामी, प्रतिवादी क्र. ३ यांनी हे म्हणणे दाखल केले आहे की, वादीने कथन केलेला मजकूर खरा नाही. मे. कोर्टाचा योगय तो हुकूम व्हावा, ही विनंती केली आहे.

**०४.** वादीचे प्रस्तूत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ३ उत्तम वामन सोनवणे हे दिनांक २४.०१.२०२२ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तूत अर्जात नमूद केलेनुसार मयत प्रतिवादी क्र. ३ यांना वारस क्र. ३-अ ते ३-ड असे एकूण चार कायदेशीर वारस आहेत. सदर दाव्याचा गुणदोषावर निकाल देणेकामी प्रतिवादी क्र. ३ उत्तम सोनवणे यांचे नावाच्या पुढे 'मयत' असे लिहून त्यांचे वारस अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. सदर दावा परिणामकारकरित्या निकाली करणेसाठी मयत पक्षकारांचे सर्व कायदेशीर वारसदार हे अभिलेखावर नमूद होणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारित करीत

आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा निशाणी क्र. ६३ चा अर्ज मंजूर करणेत येतो. |
| २. | वादीने त्याच्या अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती विहीत कालावधीमध्ये करावी व त्याप्रमाणे दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करणेत यावी. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

(अ. क. दामटे)
दिनांकः- १०.०७.२०२३
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.